# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक २१.०५.२०२६ गुरुवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २०.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ०३ ईसमांवर कारवाई करून ४,७३०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०४ ईसमावर कारवाई करून १०,४००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,९०१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,२७,८००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा, सोनसाखळी चोरी विरोधी पथकाची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपीस २४ तासाचे आत अटक.**

दिनांक १९.०५.२०२६ चे १५.३० वा. चे सुमारास, फिर्यादी नामे श्रीमती बेबी रामाजी मोरे वय ६७ वर्षे, रा. उत्कर्ष अपार्टमेंट, ब्लॉक क्र. सी—१०३, सदर, नागपुर ह्या पोलीस स्टेशन सदर हद्यीतील सेंट उर्सुला शाळेसमोरील त्यांचे प्रदीप नर्सरी येथे हजर असतांना काळया रंगाचे दुचाकीवरुन एक अनोळखी इमस रोपटे घ्यायला आला व रोपटयांबाबत विचारपुस करीत असतांना फिर्यादी हया दुकानात एकटया आहे असे बघून फिर्यादीचे गळयातील सोन्याची चैन व मनी असलेले मंगळसुत्र किमती अंदाजे ७०,७३६/— रु. चे जबरीने हिसकावून पळून गेला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सदर येथे आरोपीविरूध्द कलम ३०४(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासात गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून २४ तासाचे आत आरोपीस निष्पन्न केले व आरोपीचा शोध घेऊन आरोपी नामे रोहीत नेमाजी मारबते वय २५ वर्षे, रा. प्लॉट नं. २१, भवानी नगर, अवचट हनुमान मंदीरजवळ, पारडी, नागपुर यास ताब्यात घेवुन, विचारपूस केली असता, त्याने वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन सोन्याचे मंगळसुत्र वजनी १३ ग्रॅम व गुन्हयात वापरलेली काळया रंगाची होंडा युनिकॉर्न दुचाकी क्र. एमएच ४९ बीटी ३९२४ असा एकुण २,४०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव सदर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. शिवाजीराव राठोड अपर पोलीस आयुक्त (अति. प्रभार गुन्हे)

नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. रोशन पंडीत, सहा. पोलीस आयुक्त (अति. प्रभार गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, सोनसाखळी चोरी विरोधी पथकाचे मसपोनि. मंगला हरडे व त्यांचे पथकाने केली.



**३) गुन्हेशाखा युनिट क्र. ०२ पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक ०१.०५.२०२६ चे ११.३० वा. ते १९.४५ वा. चे दरम्यान, फिर्यादी प्रतीक चंद्रशेखर आंबेडकर, वय २६ वर्षे, रा. लालगंज, बारईपुरा, ईतवारी, नागपूर यांनी त्यांची होन्डा अॅक्टीवा गाडी क्र. एम. एच. ४९ ए.एफ. ३२८८ किंमती ३०,०००/—रू. ची पोलीस ठाणे धंतोली हद्दीत यशवंत स्टेडीयम, बिझीनेस अॅग्लोरिधिम दुकान समोर पार्कींग मध्ये लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे धंतोली येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ०२ चे अधिकारी व अंमलदार यांना माहिती मिळाली की. वाहन चोरी करणारा आरोपी हा पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत मिठानिम दर्गाह परिसरात फिरत असल्याचे खात्रीशीर माहीती प्राप्त झाल्याने, त्याचा शोध घेतला असता, प्राप्त वर्णनाचा ईसम दिसुन आल्याने, त्यास ताब्यात घेतले. त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव राजा खान सलीम खान, वय २९ वर्षे रा. मोठा ताजबाग, उमरेड रोड, सक्करदरा, नागपूर असे सांगीतले. त्यास वर नमुद वाहन चोरीचे गुन्ह्यासंबंधाने विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार नामे समीर उर्फ गिज—या शमीम शेख वय २२ वर्ष रा. टेकानाका, नागपूर याचेसह संगनमताने गुन्हा केल्याची कबुली दिली. वाहनाबाबत विचारले असता वर्धा पोलीसांनी त्यास घरफोडीचे गुन्हयात अटक केली होती, त्यामध्ये गुन्हयातील वाहन जप्त असल्याचे सांगितले. आरोपीस पुढील कारवाईकामी धंतोली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (अती. कार्य. गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. रोशन पंडीत, सहा. पोलीस आयुक्त (अती. कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख, सपोनि गजानन चांभारे, पोहवा महेंद्र सडमाके, पोअं. संदीप पांडे, विवेक श्रीपाद यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे बेलतरोडी :— जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपी पतीस तात्काळ अटक.**

दिनांक २१.०५.२०२६ चे ००.०५ वा. चे सुमारास, बेलतरोडी पोलीसांचे बिट मार्शल हे पोलीस ठाणे हद्यीत पेट्रोलींग करीत असतांना, गोटाळपांजरी, ग्रीन सिटी—४ जवळ, एका इसमाने येऊन त्यांना सांगितले की, त्यांचा मुलगा त्याचे सुनेला चाकुने मारहाण करीत आहे. अशा प्राप्त माहितीवरुन फ्लॅट क्र. १०६, टयुलिप ०२,

बी विंग, ग्रीनसिटी ०४ येथे जाऊन पोलीसांनी फ्लॅटचा दरवाजा आतून बंद असल्याने व उघडत नसल्याने दरवाजा तोडून, आत प्रवेश केला असता आरोपी नामे ऋषिकेश सुरेंद्र वानखेडे वय २२ वर्ष याने त्याची पत्नी सौ. अश्लेषा ऋषिकेश वानखेडे वय २४ वर्ष हिला चाकुने गळयावर, मानेवर वार करुन जखमी केल्याचे दिसून आले. पोलीसांनी तात्काळ आरोपीस ताब्यात घेतले व. निशस्त्र केले. गंभीर जखमी महिला यांना त्वरीत उपचाराकरीता एम्स हॉस्पिटल येथे पाठविण्यात आले. विचारपुस केली असता आरोपी हा फिर्यादी महिलेचे चारित्र्यावर संशय घेऊन तिला शिवीगाळ करीत असतो व त्याच कारणावरुन त्यांचे भांडण होऊन आरोपीने तिला जिवे ठार करण्याचे उद्येशाने चाकूने मारुन जखमी केल्याचे सांगितले.

याप्रकरणी फिर्यादी सौ. अश्लेषा ऋषिकेश वानखेडे यांनी दिलेल्या बयाणावरुन पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि नारायण घोडके ९२६०६०८०१० यांनी आरोपींविरूध्द कलम १०९ भा.न्या.सं., सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कोराडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १९.०५.२०२६ चे १४.०० वा. ते दिनांक २०.०५.२०२६ चे ०६.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कोराडी हद्दीत, प्लॉट नं. १६८, स्मृती नगर, बोखारा, नागपुर येथे राहणारे लोको पायलट फिर्यादी राजु रामप्रियसिंग चव्हाण वय ४० वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन डयुटीकरीता बल्लारशाह येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचा कडी—कोंडा कापून, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ३०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने व एक कॅमेरा असा एकुण किंमती २,७०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यांप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे मपोउपनि. निशा गवळी ९८३४३२७९२५ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे तहसील :—**

**अ)** दिनांक १८.०५.२०२६ चे ०१.२० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे तहसील हद्दीत, टिमकी, टोपरेची विहीरजवळ एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ४० वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल, वार्ड क्र. ३७ येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक २०.०५.२६ चे १४.५० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे तहसील येथे पोउपनि. निशांत पवार यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**ब)** दिनांक १९.०५.२०२६ चे २२.२८ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे तहसील हद्दीत, हंसापुरी चुना मस्जिदजवळ एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ५० वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल, वार्ड क्र. ३७ येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक २०.०५.२६ चे ११.०० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे तहसील येथे पोउपनि. निशांत पवार यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे गणेशपेठ :—** दिनांक २०.०५.२०२६ चे १८.५० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, राहूल कॉम्प्लेक्सकडे जाणारा रोड, साई पान शॉपजवळ एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ५० ते

५५ वर्षे वयाचे, रंग सावळा, बांधा मध्यम, उंची ५ फुट ४ इंच, डोक्याचे केस काळे, अंगात पांढरे रंगाचा काळे ठिपके असलेला फुलशर्ट व काळया रंगाचा फुलपॅन्ट घातलेला, अशा वर्णनाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे गणेशपेठ येथे सपोनि. गाडगे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे हुडकेश्वरः</u>–** दिनांक २०.०५.२०२६ चे १५.१५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत प्लॉट क्र. १५४, लाडीकर ले आऊट, मानेवाडा रोड, येथे जांगीड यांचे चार मजली निर्माणाधीन इमारतीचे बांधकाम सुरु आहे. तेथे नवीन राजकुमार मानेश्वर वय २० वर्ष रा. सुयोग नगर, गांवडे ले आऊट, अजनी, नागपूर हा ड्रील मशीनने भिंतीला छिद्र पाडण्याचे काम करीत असतां, त्यास इलेक्ट्रीक करंट लागून बेशुध्द झाला. त्यास उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

यापकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे मसपोनि. दंडवते ९९२३०२३४१८ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०२, नागपुर. | ३०५०२६३ /१९९७ | कलम ३८०,४१४ भा.दं.वि. | मोहम्मद नाझीर अब्दुल गफ्फार रा. नालसाब चौक गुलाब बाबा जवळ, तहसील नागपुर | ०४.०६.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**